# ॲग्रोमेट ॲडवायझरी बुलेटीन

## ग्रामीण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु,

## कृषी हवामानशास्त्र विभाग

फोन:०२०-२९५१६२६४ कृषी महाविद्यालय, पुणे ४११ ००५ ई-मेल:amfupune@gmail.com


## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. ०५/०५/२०२६

## जिल्हा :पुणे

### मागील आठवडयाचे हवामान :

**मागील आठवडयाचे हवामान :** पुणे परिसरात मागील आठवडयात कमाल तापमान ३६.७ ते ३९.७ अंश सेल्सिअस तर किमान तापमान २०.४ ते २३.५ अंश सेल्सिअसच्या दरम्यान होते. सकाळची सापेक्ष आर्द्रता ४५ ते ७७ टक्के तर दुपारची सापेक्ष आर्द्रता १७ ते २८ टक्के होती. वाऱ्याचा सरासरी वेग ताशी ५.२ ते ८.५ कि.मी. होता.

**हवामान अंदाज :** पुढील पाच दिवसात पुणे जिल्ह्यात कमाल तापमान ३८ ते ४१ अंश सेल्सिअस, तर किमान तापमान २१ ते २३ अंश सेल्सिअसच्या दरम्यान राहील. सकाळची सापेक्ष आर्द्रता ५५ ते ७८ टक्के तर दुपारची सापेक्ष आर्द्रता १४ ते १६ टक्के दरम्यान राहील. वाऱ्याचा सरासरी वेग ताशी ०८ ते १३ कि .मी. दरम्यान राहील. आकाश निरभ्र ते अंशतः ढगाळ राहील . वाऱ्याची दिशा नैऋत्तेकडून ईशान्येकडे राहील.

| मागील आठवड्यातील हवामान (२९/०४/२०२६ ते ०५/०५/२०२६) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (०५/०५/२०२६ ते ०९/०५/२०२६) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 29 | 30 | 1 | 2 | 3 | 4 | 5 | दिनांक | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 | पाऊस (मिमी) | 0.0 | 0.0 | 7.0 | 6.0 | 0.0 |
| 39.7 | 39.5 | 37.8 | 36.7 | 37.2 | 38.3 | 37.2 | कमाल तापमान(अं.से.) | 38 | 39 | 40 | 40 | 41 |
| 23.4 | 21.7 | 23.5 | 20.4 | 22.0 | 23.0 | 23.2 | किमान तापमान(अं.से.) | 21 | 22 | 23 | 22 | 21 |
| | | | | | | | ढग स्थिती (आकाश) | 0 | 1 | 3 | 3 | 2 |
| 45 | 60 | 62 | 63 | 74 | 68 | 77 | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | 78 | 74 | 62 | 61 | 55 |
| 17 | 23 | 28 | 28 | 24 | 28 | | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | 15 | 14 | 16 | 16 | 14 |
| 5.7 | 5.2 | 8.5 | 8.3 | 7.9 | 7.3 | 8.3 | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | 12 | 13 | 10 | 8 | 9 |
| | | | | | | | वाऱ्याची दिशा (अंश) | 284 | 294 | 309 | 301 | 300 |

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | पीक अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश/ इशारा | | भारतीय हवामान खात्याच्या प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांच्या अंदाजानुसार जिल्ह्यात दिनांक ०५, ०६ व ०९ मे, २०२६ रोजी हवामान कोरडे राहण्याची शक्यता असून दिनांक ०७ व ०८ मे, २०२६ रोजी तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता आहे. |
| विस्तारित श्रेणी अंदाज (ईआरएफएस) | | विस्तारित श्रेणी अंदाजानुसार (ईआरएफएस) मध्य महाराष्ट्र विभागात (धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर) दिनांक १० ते १६ मे, २०२६ दरम्यान<br>➢ पावसाचे प्रमाण सरासरी पेक्षा जास्त राहण्याची शक्यता आहे.<br>➢ कमाल तापमान सरासरी इतके राहण्याची शक्यता आहे.<br>➢ किमान तापमान सरासरी पेक्षा जास्त राहण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | • अवेळी पावसाची शक्यता असल्याने पक्व झालेल्या पिकांची, फळे व भाजीपाल्याची काढणी करुन घ्यावी.<br>• काढणी झालेल्या पिकांची मळणी करुन सुरक्षीत ठिकाणी साठवणूक करावी. मळणी करणे शक्य नसल्यास, काढलेली पिके पावसापासून संरक्षण होण्याच्या दृष्टीने योग्यरीत्या झाकून ठेवावीत.<br>• अवेळी पावसापासून बचावासाठी उघडयावरील धान्य सुरक्षित स्थळी हलवावे.<br>• पावसाची शक्यता असल्याने कीटकनाशकाची व बुरशीनाशकाची फवारणी शक्यतो पावसाची उघडीप बघून करावी.<br>• पुढील पाच दिवसात जिल्ह्यात कमाल तापमान ३८ ते ४१ अंश सेल्सिअसच्या दरम्यान राहण्याची शक्यता असल्याने शेतकरी बांधवांनी स्वतःची, पिकाची व पशुधनाची काळजी घ्यावी.<br>• उष्ण हवामानामुळे पिकांमधून वाष्पोत्सर्जन वाढून पाण्याचा ताण, फुलं/फळ गळ आणि सिंचन कार्यक्षमता कमी होण्याची शक्यता आहे. मातीतील ओलावा टिकविण्यासाठी व बाष्पीभवन |

| | | |
|---|---|---|
| | | रोकण्यासाठी अच्छादन (मल्चिंग) करणे फायदेशीर ठरेल. नवीन लागवड केलेल्या फळबागेमध्ये जमिनीत ओलावा टिकवून ठेवण्यासाठी आच्छादनांचा वापर करावा.<br>• सध्याच्या तापमानातील वाढीमुळे उभ्या पिकांना व फळ बागांना हलका व वारंवार आवश्यकतेनुसार व उपलब्धतेनुसार सकाळी किवा संध्याकाळी पाणीपुरवठा करावा.<br>• उन्हाच्या तीव्रतेपासून संरक्षणासाठी शेतकऱ्यांनी शेतीची कामे शक्यतो पहाटे ते सकाळ सत्रात आणि संध्याकाळी करुन घ्यावी. दुपारच्या कडक उन्हात शेतात काम करणे टाळावे. थेट सूर्यप्रकाशात सतत काम करू नका; अधूनमधून सावलीत विश्रांती घ्यावी.<br>• नवीन लागवड केलेल्या फळबागेमध्ये जमिनीत ओलावा टिकवून ठेवण्यासाठी आच्छादनांचा वापर करावा. नवीन लागवड केलेल्या फळबागांतील रोपांचे उन्हापासून संरक्षण करावे.<br>• हरभरा व ज्वारी पिकाची काढणी पूर्ण झाली असेल तेथे गरज असल्यास नांगरणी किंवा कुळवणी करून घ्यावी.<br>• पिकाचे कीड व रोगासंदर्भात नियमित सर्वेक्षण करून , जर प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीच्या वर असल्यास, विविध योग्य त्या उपाययोजना कराव्यात.<br>• कीटकनाशक आणि तणनाशकाची फवारणी करताना वेगवेगळी करावी.<br>• कोणत्याही पिकावर कोणतेही कीटकनाशक, बुरशीनाशक किंवा तणनाशक फवारताना , त्या पिकाकरिता त्या रासायनिक औषधाचा लेबल क्लेम असल्याची खात्री करूनच वापर करावा.<br>• भाजीपाला पीके जसे वांगी, भेंडी, गवार इ. लागवडीनंतर रसशोषक किडींच्या जैविक नियंत्रणासाठी पीकाच्या अवस्थेनुसार पिवळे चिकट सापळे, सापळा पीके, जैविक बुरशीनाशके (मेटारायझीयम, ट्रायकोग्रामा, व्हरटीसिलीयम इ.) यांचा वापर करावा आवश्यकता असल्यास रासायनिक कीड आणि बुरशीनाशकाचा वापर करावा.<br>• हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला व हवामा नाच्या पूर्वानुमाना करिता 'मेघदुत' मोबाईल ॲपचा वापर करावा.<br>• मेघगर्जना व विजेच्या पूर्वानुमानाकरिता 'दामिनी' मोबाईल ॲपचा वापर करावा.<br>• कृषिविषयक माहितीसाठी, महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या कृषिदर्शनीचा एक संदर्भ ग्रंथ म्हणून उपयोग करावा.<br>• विहीर पुनर्भरण : विहीर पुनर्भरण व कूपनलिका पूनर्भर णासाठी योग्य उपाय योजना करावे. भूजल सा ठा वाढण्याचा नैसर्गिक वेग कमी असल्याने कृत्रिमरित्या हा वेग वाढविण्याचे उपाय योजणे गरजेचे झाले आहे. विहीर पुनर्भरण व कूपनलिका पूनर्भरण हा त्यापैकी एक उपाय आहे. पावसाचे पाणी विहीरीत सोडणे म्हणजे विहीर पूनर्भरण होय. यासाठी ओढा किंवा नाल्यातून वाहणारे पावसाचे पाणी , पावसाचा अपधाव यांचा वापर करून विहीर व ओढ्याच्या अंतरामध्ये दोन स्वतंत्र खड्डे योग्य अंतरावर घेऊन पुनर्भरण करता येतो.<br>• शेततळी : एकुण पावसाच्या २० ते ४० टक्के पाणी जमिनीच्या पृष्ठभागावरून वाहुन जाते. अशा परिस्थितीत पाणलोट क्षेत्रात योग्य ठिकाणी शेततळी खोदून असे वाहून जाणारे पाणी शेततळयात साठवावे. शेततळे पाणलोट क्षेत्राच्या खोलगट भागात खोदावे. उंचवट्याच्या जमिनीवरून वाहून जाणारे पाणी शेततळयाकडे वळविण्यासाठी योग्य ठिकाणी गवताचे रस्ते करावे अशा प्रकारे शेतातील वाहुन जाणारे पाणी व माती शेततळयात जमा होते. गाळाच्या मातीमध्ये पीक पोषक अन्नद्रव्ये असतात. अशी माती शेत जमिनीत टाकल्यामुळे जमिनीचे भौतिक व रासायनिक गुणधर्म सुधारतात. शेततळयातील पाणी पिकास एक संरक्षीत पाणी म्हणून दिल्यास उत्पादनात वाढ होते. |
| **ऊस** | पीक वाढीची अवस्था | ऊस पिकातील खोड किडी च्या जैविक नियंत्रणासाठी ट्रायकोग्रामा चिलोनिस (ट्रायकोकार्ड) ५ ते ६ ट्रायकोकार्ड १५ दिवसाच्या अंतराने प्रति हेक्टरी वापरावे तसेच ५ कामगंध सापळे (इ.एस.बी. ल्यूर) प्रति हेक्टरी वापरावे. सुरु ऊसाला एका आड एक सरीतून पाणी दयावे व पीक तणविरहीत ठेवावे. बाष्पीभवन कमी करण्यासाठी ऊसाचे पाचट सरीमध्ये आच्छादन म्हणून वापरावे. ज्या ठिका णी पट्टा पध्दतीने लागण केलेली आहे अशा ठिकाणी ठिबक सिंचन पध्दतीचा अवलंब करावा. सुरु उसामध्ये बाळबांधणी अथवा मोठी बांधणी करून घ्यावी. |
| **मका** | काढणी ते साठवणूक अवस्था | अमेरिकन लष्करी अळीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी निंबोळी अर्क ५% किंवा इमामेक्टीन बेंझोएट ५ % एस.जी. ८ ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. मात्र फवारणी केलेल्या मक्याचा वापर जनावरांच्या चा-यासाठी तसेच मका कणसांचा वापर खाण्यासाठी करु नये. पीक काढणी अवस्थेत आलेले असल्यास त्याची काढणी करावी. तसेच उन्हात चांगले वाळवावेत. साठवण कोंदट किवा ओलसर जागेत करू नये. |
| **उन्हाळी भुईमुग** | शेंगा पोसण्याच्या ते भरण्याची अवस्था | भुईमूगाच्या शेंगा पोसण्याच्या कालावधीत पाण्याचा ताण पडू देवू नये. पिकास जमिनीच्या मगदुरानुसार व पिकाच्या वाढीच्या अवस्थेनुसार पाण्याचे नियोजन करावे. रस शोषक किडींच्या नियंत्रणासाठी मिथिल डीमेटोंन २५ ईसी १० मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| **कांदा** | पक्वता ते काढणी अवस्था | काढणी केलेल्या शेतमालाची सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. कांदा काढताना पातीसह काढून तो ३ ते ४ दिवस शेतामध्ये सुकू द्यावा. काढलेला कांदा ओळीमध्ये रचावा व अर्धवटरित्या पातीने झाकावा. पात वळल्यानंतर |

| | | |
|---|---|---|
| | | ४ से.मी. लांब मान ठेऊन पात कापावी. |
| केळी | पीक वाढीची अवस्था | जिल्ह्यात तापमान अधिक राहण्याची शक्यता असल्याने केळी बागेच्या कडेने शेड–नेटचे कुंपण करावे तसेच केळीच्या घडाचे उन्हापासून संरक्षण करण्यासाठी केळीच्या वाळलेल्या पानांची पेंडी करून घड व घडाचा दांडा झाकावा. पिकास जमिनीच्या मगदुरानुसार व पिकाच्या वाढीच्या अवस्थेनुसार ड्रीपद्वारे पाण्याचे नियोजन करावे. पावसाची शक्यता असल्याने झाडे पडू नयेत म्हणून व वजनाने मोठ्या असलेल्या घडास गरजेप्रमाणे बांबूच्या किंवा पॉलीप्रोपेलीनच्या पाट्यांच्या सह्यायाने झाडांना/ घडांना आधार/ टेकू द्यावा.<br>पनामा रोगाचे प्रभावीपणे व्यवस्थान करण्यासाठी प्रारंभिक उपाय योजना :-<br>कोणताही रोग फक्त बुरशीनाशके वापरून रोग नियंत्रणाच्या उपायांना मर्यादा येतात. म्हणूनच प्रतिबंधात्मक उपयांवर भर देणे अत्यंत महत्वाचे आहे.<br>केळी कंद निवड व प्रक्रिया :-<br>केळी लागवडीसाठी कंद अथवा मुनवे निरोगी आणि जातीवंत बागेतून निवडावे. लागवडीपुर्वी १०० लिटर पाण्यात १०० ग्रॅम कार्बेन्डाझिम अधिक १५० ग्रॅम ॲसिफेट व १५ ग्रॅम स्ट्रेप्टोसायक्लीन घेवून या द्रावणात कंद ३० ते ४० मिनीटे बुडवावीत व नंतर लागवड करावी किंया मुनवे / रोपे जैविक बुरशी (ट्रायकोडर्मा हर्नियानम / ट्रायकोडर्मा एस्पेरेलम) अधिक जैविक जीवाणू (स्यूडोमोनास फ्लोरोसेंरा) च्या द्रावणात बडवून लागवड करावी.<br>ऊतिसंवर्धित रोपांची निवड :-<br>अलीकडच्या काळात मोठ्या प्रमाणावर ऊतिसंवर्धित रोपे लावून केळीची लागवड केली जाते. मात्र यात रोपांची निवड अंत्यत महत्वाची आहे. एक सारख्या वाढीचे ३० ते ४५ सेंमी उंचीचे, किमान ५ ते ६ पाने असलेली रोग विरहित आणि उत्तम कणखरता असलेली रोपे असावीत.<br>खालील एकात्मिक रोग व्यवस्थापन पद्धतीने हा रोग नियंत्रित केला जाऊ शकतो :-<br>* चांगल्या कृषि पद्धतींचा अवलंब<br>* शेत तणमुक्त ठेवावे.<br>* दुरावासाचे ( क्वारनटाईन) चे नियम काटेकोरपणे पाळावे , नाविन्यता म्हणून किंवा कॅरहेण्डीश व इतर जनुक समुदायातील (जिनोमिक गट) वाण परराज्यातून आणून त्यांची लागवड करू नये. महत्वाचे म्हणजे एक पिक पध्दतीचा अवलंब न करता केळी फळपिकावर केळी पीक घेणे टाळून पिकांची फेरपालट करावी.<br>* प्रादुर्भावग्रस्त शेतातून बाहेर पडण्यापूर्वी तसेच शेतात जाण्यापूर्वी ट्रॅक्टरचे टायर , नांगर आणि इतर उपकरणे निर्जंतुक करणे आवश्यक आहे.<br>* 'क्लीन इन अँड गो आऊट' पॉलिसीचे पालन करा (शेतात प्रवेश करताना प्लास्टिक (पॉलिथिनचे) शूज किंवा फूट कव्हर घाला आणि शेतातून बाहेर पडताना ते काढून टाका आणि पुन्हा वापरण्यासाठी ठेवा) , शेतात प्रवेश करताना बांधावर दोन ड्रम, एक पाणी ठेवण्यासाठी आणि दुसरा निर्जंतुकीकरण द्रावण ठेवण्यासाठी (१% पॉली डायमिथाइल अमोनियम क्लोराईड १ लिटर पाण्यात १० ग्रॅम या प्रमाणात) वापरलेली उपकरणे , हात आणि पाय प्रथम पाण्याने आणि नंतर जंतुनाशक द्रावणाने धुवावे.<br>* खतांचे योग्य व्यवस्थापन करावे, खतांच्या शिफारस केलेली मात्रा (नायट्रोजन कमी प्रमाणात आणि पोटॅशियम जास्त प्रमाणात) वापरावी.<br>* सेंद्रिय खते पुरेशा प्रमाणात वापरून मातीचे आरोग्य सुधारावे. यामध्ये गांडूळ खत , कडुनिंबाचा पेंड, चांगले कुजलेले शेणखत वापरावे.<br>* प्रादुर्भावग्रस्त शेतात 'सावधान' चे बोर्ड लावून, झाडाला रंगीत रिबन बांधावी.<br>* प्रादुर्भावग्रस्त शेतातील पाणी इतर शेतात जाणार नाही याची काळजी घ्यावी. |
| आंबा | फळ धारण ते पक्वता अवस्था | बागेत झाडांच्या आळयांमध्ये गवत, पालापाचोळा इ. अछ्यादनाचा वापर करावा. फळ पिकण्याच्या अवस्थेत असताना फळमाशीची मादी फळांच्या सालीत अंडी घालते. त्यातून बाहेर येणा-या अळया गरावर उपजीविका करतात. किडीच्या नियंत्रणासाठी कीडग्रस्त फळे नष्ट करावीत. झाडाखाली जमीन नांगरावी. तसेच फळमाशीच्या नियंत्रणासाठी मिथिल युजेनॉल युक्त रक्षक सापळे बागेमध्ये एकरी ८-१० याप्रमाणे लावावेत. पक्व झालेल्या आंब्याची काढणी शक्यतो सकाळी दहापुर्वी किंवा दुपारी ४ नंतर करावी तसेच आंबा फळांची वाहतुक शक्यतो संध्याकाळी करावी. तयार झालेली आंब्याची फळे काढून सुरक्षित ठिकाणी पिकण्यासाठी ठेवावे. उन्हापासून फळावर पडणाऱ्या डागाच्या संरक्षणासाठी घन लागवड व अति घन लागवड बागेमध्ये फळास बॅगेचे आवरण करावे. |
| द्राक्ष | छाटणी पश्चात | फळ काढणी पूर्ण झाल्यानंतर, छाटणी वेळेवर करून छाटलेल्या काड्या व पाने बांधावर न टाकता योग्य रित्या नष्ट करावे. छाटणी नंतर १ टक्के बोर्डोमिश्रणाची फवारणी करावी. बागेस पाण्याचा संतुलित वापर/पुरवठा करावा. बागेत सेंद्रिय आच्छादनाचा वापर करावा व शिफारशीत मात्रेनुसार संजीवकाचा वापर करावा. |
| जनावरांचे व्यवस्थापन | | कोंबड्यांचे उष्णतेपासून संरक्षणासाठी पोल्ट्री शेडच्या बाजूने बारदाना लावावे व ते पाण्याने भिजवावे तसेच छतावर गवताचे किंवा बारदानाचे आच्छादन करावे त्यामुळे पोल्ट्री शेडचे तापमान कमी होण्यास मदत होते. वाढत्या तापमानामुळे गाभण जनावरे बाहेर चरावयास नेऊ नये. विशेषतः उष्ण |

| | | |
|---|---|---|
| | | भागात गाई म्हशीच्या अंगावर गोणपाट टाकून पाणी टाकावे. जनावरांचा गोठा थंड जागी किंवा झाडाखाली बांधावा. गोठ्याच्या छपरावर गवत , पाला, पाचोळा, नारळाच्या झावळया टाकून पाणी शिंपडावे त्यामुळे गोठा थंड राहतो. उन्हाळयामध्ये जनावरांना ३-४ वेळा थंड व स्वच्छ पाणी पाजावे. गोठ्यात पाण्याची स्वतंत्र सुविधा केलेली असल्यास पाण्याचे भांडे सावलीत असावे व भांडे मुख्यत: माती किंवा सिमेंटपासून बनवलेले असावे जेणेकरून त्यात पाणी दिवसभर थंड राहील.<br>महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या देशी गाय संशोधन प्रशिक्षण केंद्रांतर्गत पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभागाच्यावतीने विकसित करण्यात आलेल्या देशातल्या पहिल्या फुले अमृतकाळ ( **Phule Amrutkal App)** या पशुसल्ला मोबाईल प्रणालीचे (ॲप) लोकार्पण झाले असून, आता आपण ते मोबाईल मध्ये इंस्टाल करून मोबाईलवर पशुसल्ला घेऊ शकतो.<br>फुले अमृतकाळ ॲप डाउनलोड (**Phule Amrutkal App Download)** केल्याने होणारे फायदे : फुले अमृतकाळ या ॲपच्याद्वारे जनावरांना उष्णतेमुळे निर्माण होणारा ताण कमी करण्यासाठी, गोठ्यातील तापमान घटविण्याकरिता व योग्य आर्द्रता राखण्याकरिता सावलीची सोय करणे, योग्य वायु विजन राखणे, पिण्याकरिता थंड पाणी उपलब्ध करून देणे, फॅन किंवा फॉगर यंत्रणा स्वयंचलीत पद्धतीने सुरू करणे तसेच संतुलित आहार नियोजन इत्यादी उपाय योजना करण्यासाठी वेळोवेळी सूचना दिल्या जातील. |

***टिप : शेतकरीबंधूनी पिकावर किटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करताना स्वत:ची योग्य ती खबरदारी/ काळजी घ्यावी तसेच फवारणी करिता किसान कवच बॉडीसूटचा वापर करावा.**

स्त्रोत :

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान : -

ठिकाण : कृ.म.वि., पुणे.

दि. : ०५.०५.२०२६

**स्वाक्षरीत**

**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, पुणे तथा**

**प्रमुख, कृषि हवामानशास्त्र विभाग, कृ.म.वि., पुणे**